11:48:05 **स.क्रि.केस नं. ५८८/२०२४**

महाराष्ट्र शासन वि. वसंत शिवराम सावंत

**निशाण नं.१२ /क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव –ऋषिकेश प्रकाश पाटील

वय – ३४ वर्षे

धंदा – सध्या नेमणुक शिरोली एम आय डी सी पोलीस स्टेशन.

राहणार – खोची. ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

१. मी कोडोली मध्ये सन २०१९ ते २०२५ पासून कार्यरत होतो. दि. ०५.०४.२०२४ रोजी मी कर्तव्यावर हजर असताना मी तसेच चिले, परिट, पाटील यांना आमचे वरीष्ठ कोडग यांनी त्यांचे दालनात बोलवून घेतले. साहेबांनी आम्हाला सांगितले की, सातवे गावी वसंत शिवराम सावंत हा त्याच्या घराच्या आडोश्याला उघडयावर दारुची विक्री करत आहे तुम्ही त्याबाबत खात्री करून कार्यवाही करा. सदर आदेशाच्या अनुषंगाने आम्ही कोडोली पोलीस स्टेशन येथून खाजगी वाहनाने सातवे या गावच्या अलिकडे असलेल्या स्मशानभुमी जवळ गेल्यानंतर परिट यांनी जवळून जाणाऱ्या दोन इसमांना बोलवून घेवून त्यांना पंच म्हणून येणार का याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यास होकार दिला. त्यांच्यासोबत आम्ही पुढे रवाना झालो. सदर सावंत यांच्या घराच्या अलिकडे गाडी थांबवून थोडे पुढे जावून आम्ही वॉच केला असता, आम्हाला एक इसम त्याचे समोर उघडयावर कागदी बॉक्स घेवून बसलेला दिसला. सदर इसमाचा आम्हाला संशय आल्यामुळे आम्ही त्यास पकडून त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव वसंत शिवराम सावंत रा. सातवे असे सांगितले.

त्यानंतर आम्ही दोन पंचांचे समक्ष कागदी बॉक्सची पाहणी केली असता, त्यामध्ये देशी दारु पहिली धार संत्रा असे लेबल असलेल्या काचेच्या १४ बाटल्या प्रत्येकी ७० रुपये किंमतीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या सिलबंद बाटल्या आढळून आल्या. त्यानंतर परिट यांनी दोन पंचांचे समक्ष पंचनामा करून त्यामधील एक बाटली परिक्षणाकरिता बाजूला काढून त्यावर कागदी लेबल लावून पंचांच्या सहया घेवून या सर्व घटनेचा घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यानंतर आम्ही आरोपी याचेकडून मुद्देमाल जप्त करून तो घेवून पोलीस ठाणे येथे आलो. सदर आरोपी हा अवैधरित्या उघडयावर दारू विक्री करत असल्यामुळे मी त्याचे विरुद्ध कोडोली पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्यादी जबाब व प्रथमवर्दी तीच आहे. त्यातील प्रथमवर्दीवर माझी सही आहे. फिर्यादीवर नजरचुकीने सही राहून गेली आहे. मात्र ऋषिकेश प्रकाश पाटभ्ल ब. नं. १५५१ अशा वर्णनाचा मी एकमेव माणूस आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. १३ व नि.१४** देण्यात येत आहे. ज्या व्यक्तीच्या ताब्यातून अवैध दारु साठा आढळून आला त्याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी सदर इसम न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्रीमती. बी. बी. आंबेकर यांचेतर्फे सुरु,**

२. आम्ही ज्या ठिकाणी छापा टाकला त्या जागेची मालकी कोणाची होती ते मला सांगता येणार नाही. ज्या खाजगी वाहनाने आम्ही छापा टाकण्याकरिता गेलो ती गाडी कर्मचाऱ्याची होती. खाजगी वाहनाचा क्रमांक फिर्यादीमध्ये नमूद नाही. सदर गाडी मालकाचे नाव संकपाळ असे होते. ज्या ठिकाणी आम्ही छापा टाकला आरोपी हा दारु विक्री करत होता तेथे आजुबाजूला कोणीही व्यक्ती नव्हती. त्यांच्या आजूबाजूला १० १५ मिटरच्या आसपास कोणीही नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा दारुबाबतची देवाण घेवाण करत असताना मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.०४.२०२४ रोजी मी तसेच इतर कर्मचारी कथन केलेल्या ठिकाणी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही प्रकारचा छापा आम्ही तेथे टाकला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नव्हता तसेच कोणतीही बाटली परिक्षणाकरिता बाजूला काढलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुद्ध चुकीची फिर्याद देवून आजरोजी चुकीची साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

12:02:12

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-
**(के.दि.काकतकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा

दिनांक. ०७.०४.२०२६